# प्रस्तावना

महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय चळवळीमधील वृत्तपत्रांचे योगदान अतिशय महत्वाचे ठरले आहे. दै. 'सत्यवादी' व 'सत्यवादीकार' पद्मश्री बाळासाहेब पाटील यांचे महाराष्ट्रातील समाज प्रबोधनाच्या चळवळीतील स्थान अतिशय महत्वाचे आहे. आपल्या अनेक वेगळया वैशिष्टयामुळे 'सत्यवादी' ने मराठी वृत्तपत्र सृष्टीमध्ये स्वतःची अशी एक वेगळी मुद्रा उमटविली आहे. आपल्या वृत्तपत्रीय कार्यामुळे 'सत्यवादी' ने बहुजन समाजाचे मुखपत्र असा लौकीक मिळविला आहे. सत्यवादीच्या या यशाचे श्रेय जाते ते सतत ६० वर्षे सत्यवादीचे संस्थापक, संपादक असणा-या कै. बाळासाहेब पाटील यांना होय. १९२६ साली सत्यवादीची स्थापना केल्यापासून १९८७ मध्ये आपल्या मृत्यूपर्यंत सातत्याने सत्यवादीकारांनी, सामाजिक, राजकीय, आर्थिक विषयावर अग्रलेख लिहिले आहेत. सत्यवादीकार बाळासाहेब पाटील यांचे व्यक्तिमत्व अष्टपैलू होते, ते हाडाचे पत्रकार, संपादक याबरोबरच एक तळमळीचे समाजसेवक होते. दै.'सत्यवादी' कोणत्याही राजकीय पक्षाचे मुखपत्र नव्हते. मात्र जे योग्य व न्याय असेल त्याचा निर्भीडपणे पुरस्कार करणारे वृत्तपत्र आहे.

'दक्षिण महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीमधील 'सत्यवादी'ची भूमिका (१९२६ ते १९७५)' प्रबंधासाठी हा विषय निवडण्याचा उद्देश म्हणजे मराठी वृत्तपत्राच्या इतिहासात कोल्हापूरच्या दै. 'सत्यवादी'ने केलेले कार्य अतिशय मोलाचे आहे. मराठी वृततपत्राच्या इतिहासात 'सत्यवादी'ने समाज प्रबोधनाच्या बाबतीत एक गौरवशाली वारसा निर्माण केला आहे. संस्थान काळात जन्माला आलेले, स्वातंत्र्योत्तर काळातही सातत्य टिकवून असलेले अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण

केलेले दै.'सत्यवादी' हे कोल्हापूरातील एकमेव वृत्तपत्र आहे. बहुजन समाजाचे स्वाभिमानाचे स्थान असणा-या कोल्हापूर संस्थानातील 'सत्यवादी' वृत्तपत्र असल्यामुळे संस्थानाच्या गौरवाबरोबर महाराष्ट्रातील अस्पृश्य उध्दार चळवळ, मंदीर प्रवेश इत्यादी सर्वच सामाजिक चळवळीत सत्यवादीचे योगदान अतिशय महत्वाचे आहे. ज्या काळात विधवा विवाह, आंतरजातीय विवाह यांना पाप समजले जाई, त्या काळात 'सत्यवादी'ने त्यांचा पुरस्कार केला. स्वातंत्र्योत्तर काळात या सामाजिक प्रश्नाबरोबरच लोकशाही तत्वाचा पुरस्कार करुन लोकशाही भक्कम करण्यास मदत केली. 'सत्यवादी'च्या गौरवशाली कार्यामुळेच 'सत्यवादी' आजच्या स्पर्धात्मक जगात सातत्य टिकवून राहिला आहे म्हणून समाज प्रबोधन चळवळीतील 'सत्यवादी'चे योगदान महत्वपूर्ण आहे.

हा प्रबंध एकूण पाच प्रकरणात विभागण्यात आला आहे. पहिल्या प्रकरणात भारतातील व मराठीतील काही मोजक्या वृत्तपत्राचा इतिहास तसेच सत्यवादीची एकंदर ५० वर्षातील वाटचाल यांचा आढावा घेतला आहे. दुस-या प्रकरणामध्ये संपादक बाळासाहेब पाटील यांचे जीवन कार्य व त्यांच्या अष्टपैलू संपादकत्वाची व सत्यवादीकारांच्या सामाजिक कार्याची थोडक्यात माहिती दिली आहे. राजर्षी शाहू महाराज हे सत्यवादीकारांचे दैवत होते तर छत्रपती कै. राजाराम महाराज 'सत्यवादी' व सत्यवादीकार बाळासाहेब पाटील यांचे आश्रयस्थान होते. त्यामुळे कोल्हापूर संस्थानाविषयी 'सत्यवादी'ची भूमिका तिस-या प्रकरणात दिली आहे. चौथ्या प्रकरणात दक्षिण महाराष्ट्राच्या समाज प्रबोधन चळवळीत सत्यवादीने जे महत्वपूर्ण कार्य केले त्याची माहिती दिली आहे. यामध्ये सत्यवादीचा जैन धर्माविषयी दृष्टीकोन, अस्पृश्य उध्दार चळवळीला दिलेले प्रोत्साहन, आंतरजातीय, विधवा विवाह यांचा

केलेला पुरस्कार, सत्यवादीकाराचे शैक्षणिक कार्य या सर्वांची चर्चा या प्रकरणात आहे. पाचव्या प्रकरणात या चारही प्रकरणांचा उपसंहार करुन समारोप केला आहे.

माझा हा प्रस्तुत लघुशोध प्रबंध वाचक व अभ्यासक यांना उपयुक्त ठरेल असा मला विश्वास वाटतो.

स्थळ - कोल्हापूर

दिनांक- ३०-६-2000

**(देवेंद्र भि. खणे)**

# ऋणनिर्देश

*एम.फिल. पदवीसाठी सादर केलेल्या या शोध प्रबंधाचे काम पूर्ण होण्यासाठी अनेक व्यक्ती व संस्था यांचे मला मार्गदर्शन आणि सहकार्य मिळाले. अनेकांनी या कामी मला प्रतयक्ष-अप्रत्यक्ष मदत केली, या सर्वांचा ऋणनिर्देश करणे ही औपचारिकता नसून ते माझे प्रथम कर्तव्य मी मानतो. कारण त्या सहकार्याशिवाय मी माझा हा अभ्यास पूर्ण करुच शकलो नसतो.*

*या एम.फिल. पदवीसाठी दै. 'सत्यवादी'चे संपादक, मा.श्री राजकुमार पाटील यांनी मला सर्वतोपरी सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे. तसेच या कामी मला प्राचार्य श्रीधर हेरवाडे व कार्यकारी संपादक, श्री सुरेश पाटील यांनी जी मदत केली त्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे. 'सत्यवादी'चे कर्मचारी श्री विलास पाटगे व श्री वसंत माने यांनाही आभार मानणे माझे कर्तव्य आहे.*

*मी या प्रस्तुत विषयाच्या लघु शोध प्रबंधाचे लेखन करताना शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागातील माझ्या संशोधक मार्गदर्शक डॉ.(सौ.) एन.डी. पारेकर यांचे व मला या विषयासाठी प्रेरणा देणारे माझे काका डॉ.बी. डी. खणे यांचे मला जे बहुमोल सहकार्य व मार्गदर्शन मिळाले, हे त्यांचे ऋण मला विसरताच येणार नाहीत. तसेच या प्रबंधासाठी इतिहास विभाग प्रमुख डॉ. अे. आर. भोसले व अन्य प्राध्यापक डॉ.एम.पी. पाटील, डॉ. एम.ए. लोहार, डॉ.(सौ.) पी.ए. पाटील या सर्व गुरुवर्यांचे जे सहकार्य लाभले त्यांचाही मी मनःपूर्वक आभारी आहे.*

*माझे वडील श्री भिमराव खणे, आई, काकी सौ. विजया खणे यांचे आशीर्वाद माझ्या पाठीशी होते हे मी या ठिकाणी नमूद करणे माझे कर्तव्य समजतो. तसेच माझे बंधू डॉ. सचिन, चि. किरण, चि. वैभव यांचेही मला प्रोत्साहन व सहकार्य मिळाले म्हणून त्यांच्याही नावाचा उल्लेख आवर्जून करतो. या सर्वांच्या आशीर्वादामुळे व सहकार्यामुळे मी हे काम पुरे करु शकलो. तसेच या प्रबंधाच्या कामी मला अनेक मित्रांनी सहकार्य केले. या प्रबंधाचे टंकलेखनाचे काम श्री सिकंदर आय. शेख यांनी अत्यंत अल्पावधीत पूर्ण केल्याबद्दल या सर्वांचाच मी विनम्र आभारी आहे.*

दिनांक - ३०-६-२०००
स्थळ - कोल्हापूर

**(देवेंद्र भिमराव खणे)**

# अनुक्रमणिका


| अनुक्रमांक | प्रकरण | पृष्ठांक |
|---|---|---|
| प्रकरण पहिले | प्रास्ताविक | १ ते २७ |
| प्रकरण दुसरे | पद्मश्री बाळासाहेब पाटील : एक अष्टपैलू संपादक | २८ ते ४६ |
| प्रकरण तिसरे | करवीर संस्थान व दैनिक सत्यवादी | ४७ ते ७५ |
| प्रकरण चौथे | सामाजिक सुधारणा व दैनिक सत्यवादी | ७६ ते १२५ |
| प्रकरण पाचवे | उपसंहार | १२६ ते १३९ |
| | परिशिष्टये | १४० ते १४४ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | १४५ ते १५१ |